CMYK

बीड । शनिवार
०५.०४.२०२५
वर्षे : ५ अंक : ०६
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१




# नांदेडमध्ये मजूरांना घेऊन जाणारा ट्रॅक्टर विहिरीत कोसळला, ८ जणांचा मृत्यू

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड लगतच्या आलेगांव शिवारात एक ट्रॅक्टर विहिरीत पडून आठ महिलांचा दुर्दैवी मृत्यू झालाय. हळद काढणीच्या कामासाठी या महिला ट्रॅक्टरमध्ये बसून जात असताना हा अपघात झालाय. या विहिरीला कठडा नसल्याने हा अपघात झाल्याचे सांगण्यात येतंय. दरम्यान, ट्रॅक्टरसह महिलांना बाहेर काढण्यासाठी जेसीबी क्रेनची मदत घेण्यात येतेय. या विहिरीला पाणी अधिकचे असल्याने मदतकार्यात अडथळा येतोय.

विहिरीत पडून सात महिलांचा दुर्दैवी मृत्यू

दरम्यान ट्रॅक्टरमध्ये बसून या शेतकरी महिला मजूर नियमितपणे हळद काढण्यासाठी जात असताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टर थेट विहिरीत कोसळला आहे. या घटनेची



माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी मदतकार्य सुरू करत दोन महिलासह एका पुरुषाला वाचवले आहे. मात्र अद्याप ही आठ जण विहिरीत बुडाले असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली आहे. घटनेची माहिती पसरताच हिंगोलीसह नांदेड पोलीस देखील घटनास्थळी दाखल झाले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे या विहिरीमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी जमा झालेले असल्याने विहिरीमध्ये ट्रॅक्टर पूर्णपणे बुडाला असून ट्रॅक्टरचा केवळ एक टायर दिसत आहे. अशातच आता अपघात एकूण १० जण असल्याची माहिती समोर आली आहे. तर बचाव कार्यसाठी गउइ आणि क्रेनदेखील घटनास्थळी दाखल झाली आहे.

**●मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान मोदींकडून आर्थिक मदत जाहीर**

**आलेगाव येथे झालेल्या या दुर्दैवी अपघातात, ११ महिला कामगारांना घेऊन जाणारी ट्रॅक्टर ट्रॉली विहिरीत पडली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेबद्दल शोक व्यक्त केला आणि मुख्यमंत्री मदत निधीतून पीडितांच्या कुटुंबियांना ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली.**

**महाराष्ट्रातील नांदेड येथे झालेल्या अपघातात झालेल्या मृत्यूंमुळे मला दुःख झाले आहे. ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले आहे त्यांच्याबद्दल संवेदना. जखमींना लवकर बरे होण्यासाठी मी प्रार्थना करतो. स्थानिक प्रशासन बाधित लोकांना मदत करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्येक मृतांच्या कुटुंबियांना पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून २ लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा केली. जखमींना ५०,००० रुपये दिले जातील.**

३ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात यश

पुढे आलेल्या माहितीनुसार, या अपघात एकूण १० जण असल्याची माहिती पुढे आली आहे. यावेळी निवासी जिल्हाधिकारी महेश वदतकर यांनी या संदर्भात माहिती दिली असून ३ जाणंना बाहेर काढण्यात यश आले आहे. तर अद्याप काही जण विहिरीमध्ये अडकून असल्याची माहिती गावकऱ्यांनी दिली आहे. सध्या घटनास्थळी गावकरी मदतीला हजर असून ३ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले आहे. मात्र या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड शहारातील वीजप्रश्नी आ.संदीप क्षीरसागरांनी घेतला आढावा

## शहरात वीजेचा लपंडाव होऊ नये याकरिता दक्षता घेण्याच्या दिल्या सूचना



**• २२० के.व्ही. च्या विद्युत मार्गिकेचे काम लवकरच होणार**

**बीड शहरात राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून लवकरच २२० के.व्ही. च्या नवीन विद्युत मार्गिकेचे काम सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे बीड शहरात असलेला अतिरिक्त विद्युत भार मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. असेही आ.संदीप क्षीरसागरांकडून सांगण्यात आले आहे.**

**बीड । प्रतिनिधी**

शहरात वीजेच्या संदर्भात होत असलेल्या अनेक समस्यांच्या बाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी महावितरण विभागाचे अधिक्षक अभियंता श्री.राजपूत यांची भेट घेत आढावा घेतला. तसेच गुरूवारी (दि.३) रोजी बीड शहरात थोडासा पाऊस झाल्यामुळे जवळपास अर्धी रात्र बीड शहरात वीज नव्हती. अशाप्रकारचा वीजेचा लपंडाव होता कामा नये असे निर्देश आ.क्षीरसागर यांनी महावितरण विभागाला दिले.

गुरुवारी (दि.३) रोजी बीड शहरात अल्प प्रमाणात पाऊस झाला होता. पाऊस आल्यानंतर बीड शहरातील जी वीज गायब झाली ते थेट अर्ध्या रात्रीनंतरच आली. त्यामुळे बीड शहरात वीजेच्या लपंडावामुळे जनजीवन विस्कळित झाले होते. वीजवितरण विस्कळीत झाल्यास सुरक्षेसह उद्योग-व्यापारांवरही मोठा परिणाम होतो. त्यामुळे वीज नियमीत आणि सुरळीत असणे गरजेचे आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी शुक्रवारी (दि.४) रोजी महावितरण विभागाचे

▶▶ उर्वरित पान २ वर

# संतोष देशमुख हत्याप्रकरण, अखेर तो मोबाईल पोलिसांना सापडला



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर राज्यात वातावरण चांगलंच तापलं. या प्रकरणात सुरुवातीपासूनच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. दरम्यान काही दिवसांपूर्वी कळंब येथे एका महिलेचा मृतदेह आढळून आला होता. मनीषा बिडवे असं या मृत महिलेचं नाव आहे, संतोष देशमुख यांना अडकवण्यासाठी या महिलेचा वापर करण्यात येणार होता, असा आरोप दमानिया यांनी केला. दमानिया यांच्या आरोपानंतर चांगलीच खळबळ उडाली.

▶▶ उर्वरित पान २ वर

## मस्साजोग सरपंच हत्या प्रकरण, आरोपींना सहकार्य करणाऱ्या पोलिसांच्या बदल्या करण्यात येतील - गृहराज्यमंत्री योगेश कदम

**बीड । प्रतिनिधी**

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपीना सहकार्य करणाऱ्या पोलिसांच्या बदल्या करा असे निर्देश गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिले. या प्रकरणात सहभाग सिद्ध झालेल्या कोणाचीही गय केली जाणार नाही असेही ते म्हणाले. कदम यांनी मस्साजोग येथे भेट दिली. यावेळी त्यांनी कै. संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. कै. देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख तसेच मुलगी वैभवी देशमुख यांच्याशी चर्चा केली. सरकार या


▶▶ उर्वरित पान २ वर




# मला सोबत ने नाहीतर...', ४० दिवसांपूर्वी लग्न झालेल्या विवाहितेची आत्महत्या ; एकाच वेळी निघाली दोघांची अंत्ययात्रा

**बीड । प्रतिनिधी**

लग्न, नवीन संसार सुरु झाला की, एकमेकांना आणाभाका देणं आलंच. प्रत्येक व्यक्तीच्या आपल्या जोडीदाराकडून असलेल्या अपेक्षा थोड्या फार फरकाने कमी जास्त असतात. अशाच अपेक्षांच्या ओझाखाली ४० दिवसांपूर्वी सुरु झालेला संसार कोलमडून गेला आहे.



बीड जिल्ह्यातील केतुरा येथे किरकोळ वादावरुन नवविवाहित दाम्पत्याने आत्महत्या केली आहे. २१ वर्षीय शुभांगी गालफाडे आणि २७ वर्षीय अक्षय गालफाडे अशी आत्महत्या केलेल्या जोडप्यांची नावे आहेत. नवदाम्पत्याच्या कुटुंबियांना मोठा धक्का बसला असून गुरुवारी दोघांवर एकाचवेळी अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. बीडच्या केतुरा येथील २७ वर्षीय अक्षय गालफाडेचा जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात २१ वर्षीय शुभांगीसोबत लग्न झालं. ४० दिवसांपूर्वी लग्न झालेल्या अक्षयची सुट्टी संपली आणि तो पुण्याला निघाला. लाईट फिटिंग काम करणारा अक्षय सुट्टी संपवून २ एप्रिल रोजी पुन्हा निघाला.

नवविवाहित पत्नी शुभांगी अक्षयकडे मलाही पुण्याला सोबत ने असा हट्ट करु लागली. मी आधी पुण्यात जातो भाड्याने घर घेतो मग तू ये, अशा शब्दात अक्षय शुभांगीची समजूत घालत होता. पण शुभांगी ऐकायला तयार नव्हती. 'मला सोबत ने नाहीतर जीव देईन', अशी धमकी देत शुभांगीने टोकाचं पाऊल उचललं.

▶▶ उर्वरित पान २ वर

# अवकाळी पावसाचा बळी : केकानवाडीत वीज कोसळून शेतकरी आणि गाईचा दुर्दैवी मृत्यू

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील आडसजवळील केकानवाडी गावात आज गुरुवारी दुपारी विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडला. अचानक आलेल्या या पावसादरम्यान वीज कोसळून एका शेतकऱ्याचा आणि एका गाईचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, देविदास शहाजी केकान (वय ६५) हे दुपारी आसरडोह रस्त्याजवळील नवरुका शिवारात आपल्या जनावरांना चारत होते. अचानक पाऊस सुरू झाल्याने त्यांनी लिंबाच्या झाडाखाली आसरा घेतला. मात्र, दुर्दैवाने याच झाडावर वीज कोसळली. या दुर्घटनेत शेतकरी देवीदास केकान यांचा जागीच मृत्यू झाला, तसेच त्यांच्यासोबत असलेली गायही वीज कोसळल्यामुळे मृत्यूमुखी पडली.




CMYK

## राष्ट्रभक्त, दूर्गसेवक, शिवपाईक जागर प्रतिष्ठान चे कर्तव्यदक्ष अध्यक्ष किसन पाटील चव्हाण

# जागर प्रतिष्ठानच्या माध्यमातून महाराष्ट्रात अनेक युवक सक्रिय

किसन पाटील चव्हाण हे नाव गेल्या काही वर्षांपासून मराठवाड्यासह महाराष्ट्राच्या बहुतांश भागात चर्चेत असणार नाव जालना जिल्ह्यातील पांगरी येथील सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या किसन दादांनी गेल्या चार वर्षांपूर्वी जागर प्रतिष्ठान ची स्थापना करून सामाजिक जीवनाला सुरुवात केली सुरुवातीला बीड जालना भागात गडकिल्ले संवर्धन मोहिमा राबवल्या आणि हळूहळू प्रतिसाद वाढत गेला आज घडीला महाराष्ट्रातल्या पंधरा हून अधिक जिल्ह्यात जागर प्रतिष्ठान सक्रिय पने कार्यरत आहे .



गेल्या पाच वर्षांपासून किसन दादांच्या नेतृत्वाखाली जागर प्रतिष्ठानच्या वतीने बीड जिल्ह्यातील ऐतिहासिक शहर असणाऱ्या धारूर येथील किल्लूयात पहिला दिवा माझ्या राजाला उपक्रमाअंतर्गत भव्य दीपोत्सव सोहळा साजरा केला जातो दीपोत्सवाची ही परंपरा अखंड सुरू ठेवण्याचा शब्द दादांनी गतवर्षीच्या सोहळ्यात दिला आहे.

आज पर्यंत जागर प्रतिष्ठानच्या माध्यमातून दोनशेहून अधिक स्वच्छता मोहिमा राबवल्या गेल्या आहेत ,किसन दादांच्या नेतृत्वाखाली जागर प्रतिष्ठान च म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांवर प्रेम करणाऱ्या शिलेदारांच मोठ जाळं म हाराष्ट्रात पसरलं आहे.

दुर्गसंवर्धन सोबतच आजच्या तरुण पिढीला शिवशंभू महाराजांचा इतिहास समजून सांगण्याचा दादांचा कायमच प्रयत्न असतो. यातूनच व्यसनमुक्ती शिबिर आयोजित करण्यात आली आहेत तसेच जागर प्रतिष्ठान च्या माध्यमांतून आजवर विविध ठिकाणाहून दीड हजार हून अधिक लोकांनी रक्तदान केलेल आहे रुग्णसेवेचा ही प्रयत्न सुरूच असतो.

स्त्री ही स्वराज्याची देवता आहे ही महाराजांची शिकवण दादांनी अंगिकारली आहे म्हणून माझ्या सारख्या असंख्य बहिणी आज दादांच्या सोबत आहेत ,दादांनी माझ्या सारख्या सर्वच बहिणीसाठी बऱ्याच ठिकाणी महिलांसाठी स्व रक्षण प्रशिक्षण शिबिर आयोजित केलेले आहेत.

सोबतच पूरग्रस्त दुष्काळग्रस्त भागात जागर प्रतिष्ठान च्या वतीने कायमच मदत करण्यात येत असते सम ाजसेवा दूर्गसेवा रुग्णसेवा अशा अनेक सामाजिक उपक्रम राबवून शिव विचार जिवंत ठेवणाऱ्या हजारो शिलेदारांच जाळं दादांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात काम करत आहे , बीडच्या छोट्या भागातून सुरू झालेलं जागर च नाव आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचलं आहे ही दादांच्या निस्वार्थ कामाची पावती आहे

शिवरायांच्या विचारांचा जागर करणारा गोंधळी म्हणजेच रायगडाचा लेक किसन दादा कारण अस की जागर प्रतिष्ठान मध्ये आठरा पगड जातीचे सहकारी दादांच्या खांद्याला खांदा लावून काम करतात एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ हा विचार जागर प्रतिष्ठान महाराष्ट्र भर पेरत आहे.

गेल्या दोन वर्षांपासून धारूर येथे दादांच्या नेतृत्वाखाली जागर प्रतिष्ठान च्या माध्यमांतून छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो तसेच गेल्या चार वर्षांपासून जागर प्रतिष्ठान चे असंख्य शिलेदार रायगडावर राज्याभिषेक सोहळ्याला जाऊन तिथे होईल ती सेवा महाराजांच्या चरणी अर्पण करतात.

महाराष्ट्रातल्या प्रत्येक गडकिल्लूयावर स्वराज्य ध्वज उभारण्याचा दादांचा मानस आहे तसेच धारूर व तामसा येथे नेताजी पालकर यांच्या स्मारकासाठी दादा कायमच पाठपुरावा करत आहेत.

येणाऱ्या काळात जागर प्रतिष्ठान महाराष्ट्रातील तरुणाईला नक्कीच एका वेगळ्याच मार्गावर घेऊन जाणार आणि युवशक्तीची ही ताकद राष्ट्राच्या हितासाठी उपयोगी आणून शिवचरणी सेवा रुजू करत राहील यात शंका नाही किसन दादांच्या रोखठोक निर्भिड अन् स्पष्ठ भूमिकेमुळे युवकांच्या मनात त्यांचे आदराचे स्थान आहे गडकिल्लूयांच्या विषयी त्यांच्या मनात असलेला निस्वार्थ सेवाभाव आम्ही जवळून अनुभवला आहे या सच्चा शिवपाईकला तुम्ही आम्ही साथ आणि ताकद देणं खरच गरजेचं आहे नक्कीच महाराष्ट्राच्या पटलावर किसन दादांच्या रूपाने एक युवा चेहरा उदयाला येतो आहे आणि येणाऱ्या काळात किसन पाटील हे नाव निर्णायक ठरणार यात शंकाच नाही

अशा या गरिबाच्या लेकराणे छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी सेवा रुजू करण्यासाठी सुरू केलेला जागरचा म हारथ असच घोडदौड करत रहो याच या बहिणीकडून शुभेच्छा...!

– प्रीती टेकाळे (गेवराई)
(लेखिका,व्याख्याता, कवियात्री)

# श्रीरामांचे जीवनचरित्र प्रत्येकाने अभ्यासावे !

लक्षावधी वर्षांची थोर परंपरा आणि संस्कृती लाभलेला जगाच्या पाठीवरील एकमेव धर्म म्हणजे हिंदू धर्म. प्रभू श्रीराम हे सकल हिंदूंचे आराध्य दैवत त्यामुळे त्यांची जयंती अर्थात श्रीराम नवमी केवळ भारतातच नव्हे, तर जगभरात अत्यंत उत्साहाने साजरी केली जाते. आदर्श राज्य म्हणून आजही रामराज्याचे उदाहरण दिले जाते. साक्षात भगवान श्रीविष्णूंनी श्रीरामाचा अवतार घेऊन मनुष्याने आदर्शवत जीवन कसे जगावे याचा परिपाठ घालून दिला. श्रीरामांच्या चरित्राचा म्हणजेच रामायणाचा अभ्यास जगातील नामांकित विद्यापीठांतून आज केला जात आहे. आदर्श राज्यकारभार कसा करावा, जनतेचे पालन पोषण कसे करावे, जनतेच्या समस्या कशा सोडवाव्यात, राज्यावर येणाऱ्या संकटांचा सामना कसा करावा याचा बोध रामायणातून होतो त्यामुळे आपल्या राज्यकर्त्यांनी रामायणाचा अभ्यास करायलाच हवा. सध्याच्या काळात दिवसागणिक समाजाचे होत चाललेले नैतिक अध:पतन , बोकाळत चाललेली गुन्हेगारी, नात्यांतील दुरावा, एकमेकांवर कुरघोडी करण्याची वाढत चाललेली प्रवृत्ती, स्वार्थांधता यावर उपाय म्हणून श्रीरामांचे जीवनचरित्र आज प्रत्येकाने अभ्यासायला हवे.

सर्वार्थाने श्रीराम सर्वार्थाने आदर्श होते. त्याकाळी जेव्हा राजे आणि राजपुत्र एकाहून अधिक विवाह करत त्याकाळीही श्रीरामांनी एकपत्नीव्रत आचरले होते. पत्नीच्या हरणानंतर वानरांचे संघटन करून त्यांनी बलाढ्य अशा रावणाचा वध केला आणि सीतामातेची सुटका केली. अश्वमेध यज्ञाच्या वेळी यजमान म्हणून विधी करण्यासाठी पत्नीची आवश्यकता असताना त्यांना दुसरी पत्नी करण्याचा सल्ला दिला गेला ; मात्र श्रीरामप्रभूंनी सीतामातेची प्रतिकृती बनवून तिला शेजारी ठेवले आणि यज्ञविधी पूर्ण केले. पत्नीशी एकनिष्ठ राहण्याचा आदर्श यानिमित्ताने त्यांनी जगासमोर ठेवला. आजमितीला समाजात अनैतिकता बोकाळलेली पाहायला मिळते. विवाहित असताना विवाहबाह्य संबंध ठेवले जातात. नात्याचा अडसर नको म्हणून लिव्ह इन रिलेशनशिपचा करार करण्याचे पाश्चात्यांचे स्तोम याला न्यायालयीन मान्यता मिळाल्याने भारततही मोठ्या प्रमाणात माजू लागले आहे. देशातील सेलिब्रिटी मंडळी या कुप्रथेचे जाहीरपणे समर्थन करू लागली आहे. आजच्या तरुणांना लग्न करण्याआधी लिव्ह इनमध्ये राहण्याचा सल्ला देऊ लागली आहेत. भारतीय संस्कृतीला न शोभणाऱ्या या फॅडमध्ये आता गुन्हेगारीचा शिरकाव होऊ लागला आहे. सहकाऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या छळाचे, फसवणुकीचे गुन्हे नोंद होऊ लागले आहेत. एकमेकांचे जीव घेतले जात आहेत. आईवडिलांच्या विरोधाला न जुम ानता घेतलेल्या निर्णयात फसवणूक झाल्याने काही मुली आत्महत्येचा मार्ग स्वीकारत आहेत. कित्येक मुलींचे जीवन यामध्ये उध्वस्त होत आहे. शारीरिक गरजा भागवण्यासाठी अनैतिकतेला कागदी कराराचे नैतिक लेबल लावून निर्माण झालेल्या संबंधांत नात्याचा गोडवा कुठून येणार ? नैतिकतेचा आदर्श प्रभू श्रीरामांनी आपल्यासमोर ठेवला आहे तो पुनर्जीवित करण्याचे दायित्व आजच्या पिढीवर आहे. वडिलांनीं सावत्र आईला दिलेल्या वचनाचा मान राखत प्रभू श्रीरामांनी १४ वर्षांचा वनवास पत्करला. एकीकडे राज्याभिषेकाची सिद्धता सुरु असताना अचानकपणे आलेला वनवास प्रभूंनी हसत हसत स्वीकारला. वनवासातून परतल्यानंतर कोणताही पूर्वग्रह मनात न बाळगता प्रभू श्रीरामांनी माता कैकयीचे पदस्पर्श करून आशीर्वाद घेतले. कुठे संपत्तीसाठी जन्मदात्या आईची हत्या करणारी आजची पिढी आणि कुठे वनवास देणाऱ्या सावत्र आईंशीही सख्ख्या आईच्या मायेने प्रेम करणारे प्रभू श्रीराम. रावणाचा वध केल्यानंतर त्याचे अंत्यसंस्कार करण्यास विभीषण तयार नव्हते, अशावेळी 'मरणांती वैराणी' या वचनानुसार प्रभू श्रीरामांनी बंधुत्वाच्या नात्याने रावणाचे अंत्यसंस्कार करण्याची तयारी दर्शवली. संकटकाळात सुग्रीव आणि विभीषणाला साहाय्य करून प्रभू श्रीरामांनी मित्रत्वाचा आदर्श जगासमोर ठेवला. प्रभू श्रीराम एकवचनी होते. मुखातून निघालेला प्रत्येक शब्द हा सत्यच असायचा. वनवासात असताना श्रीरामांनी अनेक शापित जीवांचा उद्धार करून आपले अवतारत्व सिद्ध केले होते.

भगवंताच्या कृपेने आणि श्रीरामभक्तांच्या प्रयत्नांनी ५०० वर्षांनंतर श्रीरामजन्मभूमीत राम मंदिर उभे राहिले, असेच प्रयत्न सुरु ठेवले तर राम राज्यही दूर नाही. रामराज्य म्हणजेच आदर्श राज्य. जिथे समस्त जीव गुण्यागोविंदाने नांदतील. जिथे सज्जनांचे रक्षण होईल आणि दुर्जनांचे निर्दालन केले जाईल. जिथे अनाचार, अत्याचार आणि भ्रष्टाचार यांना स्थान नसेल. राजधर्म काय असतो, राजाचे प्रजेपती काय कर्तव्य असते हे प्रभू श्रीरामचंद्रांनी आपल्या आचरणातून जगाला दाखवून दिले आहे. देशात रामराज्य आणायचे असेल तर राजकीय मंडळींवर विश्वास ठेवून चालणार नाही. रामराज्याची स्थापना सर्वप्रथम आपल्या मनात करावी लागणार आहे. त्यासाठी मनातील दोषांचे निवारण आणि गुणांचे संवर्धन करण्याचे प्रयत्न आपल्याला करावे लागतील. 'सामर्थ्य आहे चळवळीचे जो जो करील तयाचे परंतु तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे' या समर्थांच्या वचनानुसार सामाजिक स्तरावर कार्य करताना प्रत्येक वेळी भगवंताचे अधिष्ठान असणे गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी वयाच्या सोळाव्या वर्षी रोहिडेश्वराला साक्षी ठेवून हिंदवी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. साक्षात आई भवानीचे त्यांना आशीर्वाद होते. समर्थ रामदासस्वामी आणि संत तुकारामांसारख्या महान संतांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. म हाराजांच्या मुखात सदैव जगदंब जगदंब हा जप असे. आई भवानीची कृपा आणि स्वराज्यनिष्ठ मावळ्यांची साथ यांच्या बळावर शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. नामस्मरणाचा महिमा अगाध आहे. नामस्म रणाने मनाची शुद्धी होते, सत्संगाने नामस्मरणाला चालना मिळते. अंतर्बाह्य शुद्धी होऊन अंतःकरणात रामराज्य आले कि समाजात रामराज्य स्थापन होण्यास वेळ लागणार नाही. सर्वांनी संघटितपणे प्रयत्न केले तर असाध्य असे काहीच नाही. कधीकाळी असाध्य वाटणारे श्रीराम मंदिराचे ध्येय पूर्ण झाले. भारतभूमीमध्ये रामराज्याची पहाटही लवकरच पाहायला मिळावी यासाठी श्रीरामनवमीच्या पावनदिनी प्रभू श्रीरामचंद्राच्या चरणी शरणागत भावाने प्रार्थना करूया ! – जगन घाणेकर

पान १ वरून पुढे...

## नांदेडमध्ये मजूरांना...

मुख्यमंत्र्याकडून मृतांना श्रद्धांजली, मृतांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपये अर्थसहाय्य

नांदेड जिल्ह्यातील आसेगाव येथे आज (४ मार्च) सकाळी ११ महिला मजुरांना घेऊन जाणारी ट्रॅक्टर ट्रॉली विहिरीत पडून झालेल्या अपघातात काही महिलांचा मृत्यू झाल्याची घटना दुर्दैवी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. हिंगोली जिल्ह्यातील गुंजगाव येथील या महिला होत्या आणि शेतिकामासाठी त्या जात होत्या. त्या विहिरीतून महिलांना बाहेर काढण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले असून निवासी उपजिल्हाधिकारी, अतिरिक्त पोलिस अधीक्षक यासह संपूर्ण यंत्रणा घटनास्थळी आहे. ३ महिलांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. हिंगोली आणि नांदेड दोन्ही प्रशासनाच्या आम्ही संपर्कात आहोत.

मृतांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लाख रुपये अर्थसहाय्य देण्यात येईल. अशा शब्दात राज्याचे गृहमंत्री आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघातावर भाष्य करत श्रद्धांजली अर्पण केली आहे.

ट्रॅक्टर चालकाचे नाव :– नागेश आवटे
विहीर खोल :– ८० फूट खोल
विहीरीत पाणी :– ५० फूट पाणी
ट्रॅक्टर मध्ये महिला :– १०
ट्रॅक्टर पुरुष :– १ + १ माणूस होता
वाचले :– ३
वाचलेली महिला :– २
वाचलेला पुरुष – १

## बीड शहारातील...

अधिक्षक अभियंता श्री.राजपूत यांची भेट घेतली. शहरातील वीज वितरण व्यवस्था तसेच वितरण व्यवस्था विस्कळीत होण्याची कारणे यांचा सविस्तर आढावा घेतला. आणि यापुढे असा प्रकार होऊ नये असे सूचित केले. यावर अधिक्षक अभियंता यांनी येणार्या काळात अचानकपणे असा वीजेचा लपंडाव होणार नाही याची दक्षता घेऊ असे आ.क्षीरसगरांना सांगितले.

## संतोष देशमुख....

दरम्यान मनीषा बिडवे यांच्या हत्याप्रकरणात आता पोलिसांना मोठा पुरावा मिळाला आहे. मनीषा बिडवे या महिलेचा मोबाईल पोलिसांनी हास्तगत केला आहे. मनीषा बिडवे यांची हत्या करणारा आरोपी राम ेश्वर उर्फ राण्या भोसले याच्या घरी हा मोबाईल सापडल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. सापडलेला मोबाईल डिस्चार्ज असून, या मोबाईलच्या माध्यमातून पुढील धागेदोरे पोलिसांच्या हाती येण्याची

पान १ वरून पुढे...

शक्यता आहे. मनिषा बिडवे हत्याप्रकरणातील मुख्य आरोपी केज येथील रहिवासी असून, तो संतोष देशमुख हत्याप्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले याच्या गावात उसतोडणीच्या कामाला होता, अशी माहिती समोर येत आहे. तर संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले हा मुकादम होता. तर बिडवे यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य साक्षीदार महादेव घुले हा देखील सुदर्शन घुले यांच्या गावचा रहिवासी आहे. या हत्या प्रकरणातील दोन्ही आरोपी आपल्याकडे ऊस तोडणीच्या कामाला होते, अशी माहिती महादेव घुले यांनी दिली आहे. दरम्यान या सर्व प्रकरणात संतोष देशमुख यांचे बंधु धनंजय देशमुख यांनी देखील शंका उपस्थित केली आहे. दरम्यान मनीषा बिडवे हत्या प्रकरणातील आरोपींना न्यायालयासम ोर हजर केले असता त्यांना नऊ दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. मनीषा बिडवे यांचा मोबाईल पोलिसांच्या हाती लागला आहे, त्यामधून बिडवे यांची हत्या नेमकी कशामुळे झाली याची माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

## मस्साजोग सरपंच...

प्रकरणी खंबीरपणे देशमुख कुटूंबियांच्या पाठीशी आहे असे त्यांनी यावेळी सांगितले. देशमुख कुटूंबियांचे सांत्वन केल्यानंतर श्री. कदम यांनी आतापर्यंत झालेल्या तपासाची माहिती घेतली. बीड तरुंगात कैदेत असणारा या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड याला अतिविशिष्ट दर्जा (ततखझ) प्रमाणे वागणूक तुरूंगातील अधिकारी देत आहेत असा आरोप सातत्याने होत आहे. याबाबत आपण मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करणार असून कराड आणि त्याच्या सहकारी अरोपीना इतर कारागृहात हलविण्याबाबत कार्यवाही संदर्भात बोलेन असे त्यांनी यावेळी माध्यमांशी बोलताना सांगितले. उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या सांगण्यावरून मी आलो आहे. या अतिशय निर्गुण हत्याप्रकरणी कोणालाही सोडले जाणार नाही व आरोपीला फाशीच होईल या पद्धतीने आपण या प्रकरणाकडे पाहत आहोत असेही श्री कदम यावेळी म्हणाले.

## मला सोबत ....

अक्षय पुण्याला जायला बसमधून निघाला. तो नवगण राजुरीजवळ पोहोचला असेल आणि शुभांगीने त्याला व्हिडीओ कॉल केला. व्हिडीओ कॉल करुन शुभांगीने गळफास लावून घेतला. हा सगळा प्रकार बघून अक्षय तातडीने माघारी फिरला. घरी येताच होत्याचं नव्हतं झालं होतं. शुभांगीचा मृतदेह शवविच्छेदन जिल्हा रुग्णालयात नेण्यात आला होता.

यावेळी शुभांगीच्या कुटुंबियांनी आक्रमक पवित्रा घेतला. ४० दिवसांपूर्वी लग्न अन् पत्नीची आत्महत्या आणि कुटुंबातील वाद या सगळ्याने निराश झालेल्या अक्षयने शेतात जाऊन गळफास लावून जीव दिला. गुरुवारी दुपारी अक्षय आणि शुभांगी यांच्या पार्थिवावर केतुरा गावंत अंत्यविधी करण्यात आले.

पान ४ वरून पुढे...

## तलवाडा येथील...

निधी लागन तो निधी आम्ही गावातून गोळा करून तुम्हाला देण्याचा आम्ही शंभर टक्के प्रयत्न करू पण आदरणीय क्रिटिकल हॉस्पिटलचे डॉ माननीय श्री फाटक साहेब यांनी खूप प्रयत्न केले देव माणूस आहे देवासारखे साहेबांनी प्रयत्न केले पण त्यांच्या प्रयत्नाला यश आले नाही. काहींनी तर डॉ साहेबांच्या चरणी समस्त होऊन काही करा पण गरिबाचा मुलगा आहे परिस्थिती बिकट आहे आम्ही सर्वजण भरतचा जीव वाचवा म्हणून आम्ही मदत त्या ठिकाणी देत आहोत कमी पडले तर आम्ही तलवाडा परिसरामध्ये झोळी मागून निधी जमा करून आम्ही तुम्हाला देऊ पण डॉ साहेब तुम्ही त्याचे प्राण वाचवा असा आग्रह युवकांकडून होत होता पण दिनांक १,४, २०२५ रोजी चार वाजता क्रिटिकल हॉस्पिटल गेवराई येथे भरतने अखेरचा श्वास सोडला. म्हणून तलवाडा व तलवाडा परिसरामध्ये भरतच्या जाण्याने हळहळ व्यक्त करीत आहे त्याच्या पश्चात आई, वडील, बहीण, चुलता, चुलती, भाऊ, आजी ,आजोबा, असा मोठा परिवार आहे भरत हा एकुलता एक असल्यामुळे कावळे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कावळे परिवाराच्या दुःखामध्ये दैनिक मराठवाडा पत्र सहभागी आहे.

## शिवप्रसाद दायमा ...

मगन दायमा, मुकेश दायमा, यांच्यासह दोन मुली नातवंडे पतवंडे असा मोठा परिवार आहे. गुरुवार दिनांक ३ एप्रिल रोजी सकाळी नऊ वाजता शहरातील चिंतेश्वर समशान भूमी यांच्यावर अंत्यसंस्कार

पान ४ वरून पुढे...

करण्यात आले याप्रसंगी माजी राज्यमंत्री लोकनेते बदामराव पंडित माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र भंडारी माजी नगरसेवक किशोर धोंडलकर यांच्यासह नातलग व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते शुक्रवार दिनांक ४ एप्रिल रोजी दुपारी चार वाजता गेवराईतील राजस्थानी मंगल भवन येथे उठावणा बैठक होणार आहे.

## कृष्णा अर्बन...

या माध्यमातून बँकेच्या कर्जदारांना विविध व्यवसाय उभारून स्वताच्या पायावर उभे राहण्यासाठी मदत मिळाली आहे.तर बँकेला चालु आर्थिक वर्षात ७५ लाखांचा नफा मिळाला आहे.बँकेचे व्हाईस चेअरमन चंद्रकांत कुलकर्णी,मुख्य कार्यकारी अधिकारी वसुदेवराव मुंडे,उपमुख्य कार्यकारी अधिकारी तानाजी जाधव,सर्व शाखेचे शाखा व्यवस्थापक,सर्व शाखेचे कर्मचारी उत्तम कर्तव्य बजावत आसून लवकरच ग्राहकांच्या सेवेत बँक मोबाईल बँकिंग,यूपिआय,फोन पे,गुगल पे सुरू करत आसून बँक १०० कोटींच्या पुढे वाटचाल करत असल्याची माहिती बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे यांनी दिली आहे.

## गहाळ झालेले...

विश्लेषणाच्या आधारे तपास केला. या तपासादरम्यान, १३ म ोबाईल परत मिळवून त्यांच्या मूळ मालकांना शुक्रवारी (दि.४) सुपूर्द करण्यात आले. संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने मोबाईल शोधकार्य सुरू केले. विविध मोबाईल कंपन्यांचे एकूण १३ मोबाईल,

पान ४ वरून पुढे...

ज्यांची एकूण किंमत ३,२५,००० रुपये होती, ते परत मिळवण्यात यश आले. तक्रारदारांनी त्यांचे मोबाईल शोधून परत मिळाल्याबद्दल पोलीस प्रशासनाचे आभार मानले. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, पोलीस उपनिरीक्षक अनिल शिंदे, संभाजीनगर पोलीस ठाण्याचे टेक्निकल नालिसिसचे कामकाज पाहणारे पो.कॉ.व्यंकटी खाडे, बीडचे टेक्निकल नालिसिस सेलचे पो.कॉ.विकी सुरवसे यांनी म ोलाची भूमिका बजावली. दरम्यान, १३ मोबाईल परत मिळवून त्यांच्या मूळ मालकांना शुक्रवारी (दि.४) सुपूर्द करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांच्यासह अधिकारी, कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## महाराष्ट्र चतुर्थ झोन...

कार्यरत असतात. त्यांच्या या कार्यकुशलतेची दखल घेत श्री ऑल इंडिया श्वेताम्बर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय अध्यक्ष श्री अतुलजी जैन, राष्ट्रीय महामंत्री अमितजी राय जैन, श्री ऑल इंडिया श्वेताम्बर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स आत्म ध्यान साधना प्रसार राष्ट्रीय अध्यक्ष शशिकांतजी ( पिटुभाऊ )कर्नावट, श्री ऑल इंडिया श्वेताम्बर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय अध्यक्ष विहारधाम तंनसुखजी झांबड, श्री ऑल इंडिया श्वेताम्बर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय अल्पसंख्याक योजनाचे राष्ट्रीय अध्यक्ष कांतीकुमारजी जैन यांनी दि. ०२ एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्राच्या अल्पसंख्याक योजना चतुर्थ झोन

पान ४ वरून पुढे...

उपाध्यक्ष ललित आब्बड यांची सर्वानुमते निवड केली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल माजी मंत्री प्रा. सुरेश नवले. जैन कॅान्फरन्स राष्ट्रीय उपाध्यक्ष सतिषजी ( बाबुलालजी ) लोढ़ा, जैन कॅान्फरन्स महाराष्ट्र चर्थत झोन चे अध्यक्ष मोहनलालजी लोढ़ा, माजी राष्ट्रीय अध्यक्ष अविनाशजी चोरडीया,माजी अध्यक्ष पारसजी मोदी, माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष ललितजी मोदी, माजी राष्ट्रीय विधिज्ञ सलगार अजितकुमार छल्लाणी, माजी आम दार राजेद्र जगताप. विजयराज बंब. दिलीपजी धुत. अशोकजी लोढा. विजयभाऊ ललवाणी (वाकीकर), राजेशजी बंब, उज्वल कोटेचा, पारसजी संचेती, मदन दुग्गड, महेद्र दुगड, जवहारमल बोरा, आणि मित्र परिवारातून ललित आब्बड यांचे अभिनंदन केले जात आहे. दरम्यान आपल्यावर सोपवलेली जबाबदारी आगामी काळात यशस्वीपणे पार पाडू असा विश्वास ललित आब्बड यांनी व्यक्त केला आहे.

## शिवरामपुरी ग्रामीण....

पतसंस्थेला चालु आर्थिक वर्षात ५१ कोटींच्या ठेवी प्राप्त झाल्या आसून त्यापैकी ४० कोटींचे कर्ज वाटप केले आहे.या माध्यमातून पतसंस्थेने कर्जदारांना विविध व्यवसाय उभारून स्वताच्या पायावर उभे राहण्यासाठी मदत मिळाली आहे.तर पतसंस्थेला चालु आर्थिक वर्षात २५ लाखांचा नफा मिळाला आहे.मुख्य कार्यकारी अधिकारी सुनिता पवार,उपमुख्य कार्यकारी अधिकारी चौरे,सर्व शाखेचे शाखा व्यवस्थापक,सर्व शाखेचे कर्मचारी उत्तम कर्तव्य बजावत आसून पतसंस्था लवकरच ६० कोटींच्या पुढे वाटचाल करत असल्याची माहिती पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुळे यांनी दिली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र
संमिश्र
शनिवार, दि. ०५ एप्रील २०२५
पान ३

# लिंबागणेश येथे महसूल प्रशासनाच्या 'जिवंत सातबारा' मोहिमेस प्रारंभ

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

महसूल व वनविभाग महाराष्ट्र शासनामार्फत १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत जिवंत सातबारा मोहिम बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण बीड तालुक्यात हि मोहीम राबविण्यात येत असुन आज दि.०४ शुक्रवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे सकाळी मारोती मंदिरात ग्राम महसूल अधिकारी गणपत पोतदार आणि महसूल सेवक ललित काकडे यांनी वाचन केले.यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, माजी सरपंच बाळकृष्ण मुळे,ग्रामपंचायत सदस्य बाळकृष्ण थोरात, दामोदर थोरात,महादेव कुदळे, भालचंद्र गिरे, अनिल ढवळे, विक्रम दाभाडे, प्रमोद निर्मळ, सर्जेराव मुळे, राजेंद्र ढास, संतोष वाणी,चेतन कानिटकर, हरिओम क्षीरसागर, संजय पावले, कल्याण मुळे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. जिवंत सातबारा मोहिमेसाठी व्यापक जनजागृती व अंमलबजावणीसाठी प्रयत्नशील राहु: चंद्रकांत शेळके , तहसीलदार बीड



शासनाची मोहीम नागरीकांच्या हिताची असुन विहित कालावधीत ग्रामस्थांनी आपल्या सज्जाचे ग्राम महसूल अधिकाऱ्यांशी संपर्क करून आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. वारसा नोंदी अद्ययावत करून ही मोहीम गतिमान करण्यासाठी पुढाकार घ्यावा .समन्वय अधिकारी म्हणून आम्ही सातत्याने संपर्कात राहून व्यापक जनजागृती व अंमलबजावणी साठी प्रयत्नशील राहु असे बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले. राज्य शासनाने महसूल विभागाचे महत्वाचे दस्तावेज असलेल्या सातबारा उता–यावरील सर्व मयत खातेदारांच्या वारसा नोंदी अधिकार अभिलेख्यात अद्ययावत करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यात जिवंत सातबारा मोहिम राबविण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात तशी घोषणा केलेली आहे. या मोहिमेसाठी आता कृती कार्यक्रम तयार केला असुन त्यासाठी १ एप्रिल ते १० मे २०२५ या कालावधीत जिवंत सातबारा मोहिमेंतर्गत वारसांच्या नोंदी सातबारावर घेण्यासाठी गतिमानतेने काम सुरू असुन शासनाच्या १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत जिवंत सातबारा मोहिम राबवली जात आहे. या मोहिमेंतर्गत सातबारा वरील गावातील सर्व मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदीची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. वारसांना विविध कामांसाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये वारसाची नोंद विहित कालावधीत अधिकार अभिलेखामध्ये नोंद न झाल्याने अडचणी येतात. हे टाळण्यासाठी राज्यभरात जिवंत सातबारा मोहिम हाती घेण्यात आली आले.या चांगल्या योजनेची अंमलबजावणी होण्यासाठी ग्रामस्थांनी आपल्याकडील आवश्यक कागदपत्रे तातडीने वेळेत ग्राम महसूल यांच्या कडे सादर करून नोंदी अद्ययावत करून घेणे आवश्यक आहे.

## महत्वाचे

### महापुरुष वकृत्व स्पर्धांचे आयोजन

## जयभिम महोत्सव: विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे




**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात, सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने महापुरुष वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सदरील स्पर्धा डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे सोमवार (दि.७) रोजी सकाळी ११ ते ५ यावेळेत आयोजित करण्यात आली आहे.या स्पर्धेत शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे. महापुरुष वक्तृत्व स्पर्धेत युगपुरुष- महाराजा सयाजी गायकवाड किंवा राजर्षी शाहू महाराज, राष्ट्रपिता क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले, संविधान शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर,साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, त्यागमूर्ती माता सावित्रीबाई किंवा माता रमाई यांच्याविषयी प्रश्न विचारले जाणार आहेत.या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी, इयत्ता ६ वी ते ८ वी कोणतेही शुल्क नाही. मात्र इयत्ता ९ वी ते १० वी पन्नास रुपये शुल्क, खुला गट ११वी च्या पुढे शंभर रुपये शुल्क आकारले आहेत. महापुरुष वकृत्व स्पर्धेसाठी आपले नाव नोंदविण्यासाठी प्रा.बाळासाहेब गव्हाणे ९८६०४५०२०१, सुमेध जोगदंड ९४२२३३२२९५, प्रा.अशोक गायकवाड ९७६६९०३९०१,प्रा.राम गायकवाड ९४२३२०३१९९, महादेव इनकर ९४२०१७११७७ ,सचिन वडमारे ९०२८४६०१०२ यांनासंपर्क साधावा. असे आवाहन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांनी केले आहे.

## पो.हे.कॉ.दत्तात्रय दुधाळ यांची सेवाज्येष्ठतेनुसार सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती

**बीड । प्रतिनिधी**



जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी शासन निर्णयातील तरतूदींनुसार पदोन्नतीमध्ये आरक्षणाचा लाभ घेऊन सेवाज्येष्ठतेनुसार पो.हे.कॉ. दत्तात्रय दुधाळ यांच्यासह ४ पो.हे.कॉ.यांना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती दिली आहे. पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्तपदे सेवाज्येष्ठतेने भरण्याबाबत निर्देश दिलेले असुन त्यानुसार शासन निर्णयातील तरतूदींनुसार पदोन्नतीमध्ये आरक्षणाचा लाभ घेऊन सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेले आहेत अशा ४ पो. हे.कॉ.यांना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदी जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी पदोन्नती दिली असुन यात शिरूर कासार पोलीस ठाण्याचे शिवाजी मुरलीधर चौधरी, जिल्हा वाहतूक शाखेचे दत्तात्रय भिमराव दुधाळ, अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याच्या शालू रामभाऊ राऊत, राजेंद्र श्रीधरराव नन्नवरे यांचा समावेश आहे. जिल्हा पोलिस दलात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल दत्तात्रय दुधाळ यांचा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह देऊन २६ जानेवारी २०२५ रोजी गौरव केला. दत्तात्रय दुधाळ यांना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## महाबोधी बौद्ध विहार मुक्तीसाठी आंदोलन उपस्थित राहण्याचे करण्यात आले आवाहन



**बीड । प्रतिनिधी**

बिहार राज्यातील बोधगया येथील महाबोधी बौद्ध महाविवार मुक्तीसाठी एकदिवसीय धरणे आंदोलन केलं जाणार आहे.सदरील धरणे आंदोलन बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज शनिवार (दि.५) रोजी सकाळी ११ ते ५ यावेळेत होणार आहे.या आंदोलनास उपस्थित राहण्याचे आवाहन आंबेडकरी जनतेने केले आहे. प्रियदर्शी राजा चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या जयंती निमित्ताने सकाळी ९:३० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे अभिवादन करुन, भव्य शांतता रॅली काढली जाणार आहे.ही रॅली बीड जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत काढली जाणार आहे. या रॅलीचे नेतृत्व भिक्खु पय्यातीस महाथेरो, भिक्खु धम्मशिल थेरो, भिक्खु पय्यावर्धन, भिक्खु अचलानंद, आर्या मेहता, भिक्खु धम्मपाल करणार आहेत. दरम्यान महाबोधी बौद्ध विहार हिंदू महंतांच्या ताब्यातुन मुक्त करण्यासाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करुन पुढील व्यापक आंदोलनाची दिशा ठरविली जाणार आहे. या एकदिवसीय धरणे आंदोलनात, बीड जिल्ह्यातील आंबेडकरी जनतेने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## मिशन लक्ष्यवेध खाजगी अकादमींचे सक्षमीकरण आर्थिक सहाय्यासाठी प्रस्ताव सादर करणे बाबत

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी व प्रतिभावंत खेळाडू तयार करण्यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे राज्यातील खेळाडूंनी आलिम्पिक सारख्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पधेत पदके संपादित करण्याकरिता नियोजनबद्ध प्रयत्न होणे गरजेचे आहे राज्यातील खेळाडूंसाठी अद्यावत क्रीडा प्रशिक्षण यंत्रणा, क्रीडा विषयक पायाभूत सुविधा, क्रीडा वैद्यकशास्त्र, क्रीडा स्पर्धांचे आयोजन, खेळाडूंना पुरस्कार व प्रोत्साहन, खेळाडूंकरिता करीअर मार्गदर्शन व खेळाडूंच्या क्षमता विकासाठी देशी / विदेशी प्रशिक्षक व संस्थांचा सहयोग हे सर्व घटक विकसित करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने मिशन लक्ष्यवेध या महत्त्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी राज्यामध्ये करण्याच्या निर्णय घेतलेला आहे मिशन लक्ष्यवेध अंतर्गत निवडण्यात आलेल्या थलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सिंग, हॉकी आणि लॉन टेनिस, रोइंग, शुटींग, सेलींग, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग, कुस्ती या १२ क्रीडा प्रकारांच्या राज्यातील उत्तम खेळाडू निर्माण करणा-या खाजगी अकादमींना आर्थिक सहाय्य देऊन अशा संस्थांचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे. मिशन लक्ष्यवेध अंतर्गत खाजगी आकदमींना आर्थिक सहाय्य करावयाच्या दृष्टीने संबंधित अकादमी मधील खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, सहाय्यक प्रशिक्षक, प्रशिक्षणासाठी उपलब्ध पायाभुत सुविधा व त्यांचा स्तर, क्रीडा साहित्य व क्रीडा अकादमीच्या कामगिरींचे गुणांकन करण्यात येऊन, ३५ ते ५० गुण प्राप्त करणा-या संस्था क वर्ग, ५१ ते ७५ गुण प्राप्त करणा-या संस्था ब वर्ग व ७६ ते १०० गुण प्राप्त करणा-या संस्था अ वर्ग अश्या प्रकारे वर्गीकरण करण्यात येणार आहे. क वर्ग अकादमींना वार्षिक रू १०.०० लक्ष, ब वर्ग अकादमींना वार्षिक रू २०.०० लक्ष व अ वर्ग अकादमींना वार्षिक रूपये ३०.०० लक्ष आर्थिक सहाय्य , पायाभूत क्रीडा सुविधा उभारणी, क्रीडा सुविधा उन्नत करणे, प्रशिक्षक मानधन, क्रीडा व प्रशिक्षण उपकरणे इ बाबींवर खर्च करण्यासाठी देण्यात येणार आहे .



*ग्रामीण माध्यमिक विद्यालय नेकनूरचा माजी विद्यार्थी चि. कार्तिक रामहारी घोडके (सफेपूर) या विद्यार्थ्यास डोळ्याचा गंभीर आजार झाल्याने त्याला उपचारासाठी दिल्ली येथे पाठविण्यात येणार आहे . त्याच्या उपचारासाठी शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या सहभागातून रु. २५000 रु. ची मदत देण्यात आली .*



## जाहीर प्रगटन

### मा.श्री.के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश–४, बीड यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. : १०३ /२०२५**

अर्जदार– सारीका पि. रामराव बांगर, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम रा. भायाळा, ता.पाटोदा,जि. बीड.

विरूध्द

गैरअर्जदार– महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, ता. जि. बीड

**अर्जदारातर्फे वकिल – ॲड. एस. बी. खाडे**

मागणी – अज्ञानाचे नावे असलेली जमीन विक्री करणेची परवानगी मिळणेबाबत..

ज्याअर्थी अर्जदार **सारीका पि. रामराव बांगर**, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. भायाळा, ता. पाटोदा, जि.बीड यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदाराचा अज्ञान मुलगा यशराज पि. रामराव बांगर याची आई असून त्यांनी अज्ञानाचे नावे मौजे भायाळा, ता. पाटोदा, जि. बीड येथील गट नं. ५३६ मध्ये १ हे १२ आर जमीन व मौजे बेनसुर, ता. पाटोदा, जि. बीड येथील गट नं. ६१२ मध्ये ० हे १० आर जमीन अज्ञानाचे नावे असलेली सदर मिळकत विक्री/हस्तांतरण करण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

आज दिनांक ०२/०४/२०२५ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **प्रकरणातील पुढील तारीख : ०२/०५/२०२५.**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहाय्यक अधीक्षक**
**जिल्हा न्यायालय, बीड**

शिक्का

## जाहीर प्रगटन

### श्रीमती. ए. टी. जगताप ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज, यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज १६३/२०२५, अश्विनी विरुध्द निरंक**

ज्यापेक्षा **अनंत पि. मारुती इंगळे रा. कळमअंबा ता. केज जि. बीड,** हया दिनांक ०८/०१/२०२५ रोजी, किंवा त्या सुमारास पोलिस मुख्यालय, बीड ता.जि.बीड येथे मयत झालेल असून अर्जदार रा.कळमअंबा ता. केज जि. बीड यांनी हया कोर्टात सदरहू मयत अनंत पि. मारुती इंगळे रा. कळमअंबा ता. केज जि. बीड, यांचे

अर्जदार :- १. अश्विनी भ्र. अनंत इंगळे, वय–२९ वर्षे, धंदा – घरकाम रा. कळमअंबा ता. केज जि.बीड ह.मु.पोलिस मुख्यालया शेजारी, संभाजीनगर, बालेपीर, नगर रोड, बीड ता.जि.बीड, २. वेदिका पि. अनंत इंगळे, वय–०६ वर्षे, धंदा–शिक्षण अज्ञान अ.पा.क. आई अर्जदार क.१ रा. सदर, ३. सई पि. अनंत इंगळे, वय–२.५वर्षे, अज्ञान अ.पा.क. आई अर्जदार क. १ रा. सदर, ४. मुद्रीका भ्र. मारुती इंगळे, वय–८० वर्षे, धंदा–घरकाम रा.कळमअंबा ता. केज जि.बीड

यांनी शासकीय/निमशासकीय कामासाठी वारसाचे सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज विधिज्ञ सी.एस. बचुटे यांच्यामार्फत केला आहे. त्यापेक्षा अर्जदाराशिवाय सदर सदरहु अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क साबित दिसल्यास त्याला सदरहू मयत **अनंत पि. मारुती इंगळे रा. कळमअंबा ता. केज जि. बीड,** चे वारसाचे सर्टिफिकेट देईल. आज दि.०२/०४/२०२५ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील दि.०६/०५/२०२५

**(मार्फत– ॲड. वाय.आर. शेळके )**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर, केज**

## जाहीर प्रगटन

### मा. श्री. के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश–४, बीड यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. :५१/२०२५**

अर्जदार– सोनाली भ्र. जगन्नाथ राउत, वय ४० वर्षे, धंदा घरकाम व शेती रा. उमापुर, ता. गेवराई, जि. बीड विरूद्ध

गैरअर्जदार– महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, ता. जि. बीड

**अर्जदारातर्फे वकिल – अँड. के. व्ही. दाभाडे, बीड.**

मागणी– अज्ञानाचे नावे असलेली मालमत्ता हस्तांतरण / विक्री करण्याची परवानगी मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार सोनाली भ्र. जगन्नाथ राउत, वय: ४० वर्षे, धंदा : घरकाम व शेती, रा. उमापुर, ता. गेवराई, जि. बीड यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदाराची अज्ञान **सोहम पि. जगन्नाथ राउत** याची आई असुन अज्ञानाचे पालनकर्ता आहे. अज्ञानांचे नावे मौजे उमापुर, ता. गेवराई, जि. बीड चे हाददीतील गट नं. ९१२ मधील ० हे. ९९ आर पोट खराब ०१ आर जमीन अज्ञानाचे नावे असलेली सदर मिळकत विक्री/हस्तांतरण करण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

आज दिनांक २८/०२/२०२५ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहाय्यक अधीक्षक**
**जिल्हा न्यायालय, बीड**

शिक्का

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ३७/२०२५**

**साखरबाई ज्ञानोबा मुंडे विरुद्ध ग्रा पं. भवानवाडी (ॲड. सचिन खाडे)**

पहा :- २.साखरबाई पि. ज्ञानोबा मुंडे, रा. भवानवाडी ता. जि. बीड.

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून

आर्जदार साखरबाई पि. ज्ञानोबा मुंडे –यांचा जन्म दिनांक–०९/११/१९६२ रोजर झालेला असुन त्यांचे जन्मची नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार कार्यालय/ न.प.कार्यालयास भवानवाडी

यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे ता.जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/०१/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १३/०२/२०२५ ही आहे.

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**तहसिलदार बीड**
**करीता**

शिक्का

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

### श्री. आर. आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात

**दिवाणी किरकोळ अर्ज क. ७६/२०२५, पद्माबाई वि. निरंक**
**(मार्फत ॲड. एस. बी. खाडे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे नाथा पि.भाऊ उर्फ भाऊसाहेब बांगर, मौजे रा. जवाहरवाडी, ता. गेवराई, जि. बीड हे दिनांक १०/०९/२०२३ मौजे जवाहरवाडी, ता. गेवराई, जि.बीड येथे मयत झाले.

अर्जदार :- १) पदमाबाई भ्र. कचरू बांगर, वय ७६, धंदा घरकाम, रा. जवाहरवाडी, ता. गेवराई, जि. बीड.

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणण असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेतुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे नाथा पि.भाऊ उर्फ भाऊसाहेब बांगर, मौजे रा. जवाहरवाडी, ता. गेवराई, जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनाक ०४/०२/२०२५ माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २५/०३/२०२५

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई**

## जाहीर प्रगटन

### मा. श्रीमती एफ.बी.बेग २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ५६८ / २०२५, शांताबाई जवंजाळ वि. निरंक**

मागणी:– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदार: १) शांताबाई भ्र. भिवराव उर्फ भिमराव जवंजाळ, वय: ८२ वर्षे, धंदा घरकाम, रा. उमरी पो. अंथरवनपिंपरी ता. जि. बीड २) वैजनता भ्र. विश्वनाथ तायड, वय: ७७ वर्षे, धंदा घरकाम, रा. चिंचोली पो. नाथापुर ता. जि. बीड, ३) सुनिता भ्र. भास्कर माने, वय ७२ वर्षे, धंदा घरकाम, रा. वाघोरा ता. जि. बीड, ४) अशिंता भ्र. संदिपान निर्मळ, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम, रा. महात्मा फुले नगर, धानोरा रोड, बीड ता. जि. बीड ५) कविता भ्र. दिलीप देशमाने, वय: ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. सैलानी बाबा वस्ती, दिदुड ता. माजलगाव जि. बीड ६) कांताबाई भ्र. सर्जेराव मगर, (मयत ), ६–अ) संजय सर्जेराव मगर, वय: ४४वर्षे, धंदा नौकरी, रा. वार्ड क. १, श्रीरामपुर कॉमर्स कॉलेज जवळ, श्रीरामपुर ता. श्रीरामपुर जि. अ.नगर

विरुध्द: १) युवराज पि भिमराव जवंजाळ, धंदा– शेती, रा. उमरी पो. अंथरवनपिंपरी ता जि. बीड, २) अर्जुन पि.भिमराव जवंजाळ, धंदा– शेती. रा. (३) सुशाला उत्तम मोरे, वय: ६८ वर्ष, धंदा, उमरी पो. अंथरवनपिंपरी ता. जि. बीड घरकाम, रा अकणी ता. मंठा जि. जालना

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे **भिमराव पि. म्हतारजी जवंजाळ राहणार – उमरी ता. जि. बीड हे दिनांक १९/०६/२००१ रोजी उमरी ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ ते ५ व गैरअर्जदार क. ३ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. तसेच अर्जदार क. ६ हा मयताचा नातु म्हणजे मयत मुलीचा मुलगा आहे तर गैरअर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले आहेत. आईवडील फार पुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत. मयत नामे भिमराव पि.म्हतारजी जवंजाळ यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरह मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत भिमराव पि.म्हतारजी जवंजाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०८/०५/२०२५ आहे.

आज दिनांक ०२/०४/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.

**(विधीज्ञ – श्री. मस्के डी. डी.)**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड**

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
शनिवार, दि.०५ एप्रील २०२५ पान ४

## श्रीराम नवमीपासून अखंड हरिनाम सप्ताह

परळी । प्रतिनिधी

तालुक्यातील धर्मापुरी येथील श्री रोकडेश्वर जागृत देवस्थान येथे श्री रोकडेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार समस्त ग्रामस्थांनी लोकसहभागातून केला आहे. यानिमित्त श्रीराम नवमीपासून ते हनुमान जयंती या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहात हनुमान-शिवमहापुराण कथा व कलशारोहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात ह भ प राहुल महाराज बोरीकर हे हनुमान शिवम हापुराण कथेचे निरूपण दररोज दुपारी एक ते चार या वेळेत करणार आहेत. दैनंदिन कार्यक्रमात पहाटे चार ते सहा वाजता काकडा आरती, सकाळी सहा ते आठ वाजता हनुमान चालीसा पारायण, सकाळी आठ ते दहा वाजता होम हवन, सकाळी ११ वाजता गाथा भजन, सायंकाळी सहा ते आठ वाजता धूप आरती, रात्री आठ ते दहा किर्तन, रात्री नऊ ते पहाटे चार वाजेपर्यंत भजन-हरिजागर होणार आहे. सप्ताहाच्या पहिल्या दिवशी ६ एप्रिल रोजी रात्री आठ ते दहा या वेळेत ह भ प आशिष महाराज बडे शास्त्री यांचे कीर्तन होणार आहे.

# लिंबागणेश येथे अवकाळी पावसाचा आंबा उत्पादक शेतकऱ्यांना फटका



### ●पंचनामे करून नुकसान भरपाईची मागणी : डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

मागील काही दिवसांत उन्हाचा पारा वाढलेला होता त्यामुळे गर्मीचे प्रमाण वाढले होते. मात्र मागील दोन दिवसांपासून ढगाळ वातावरणामुळे आंबा, ज्वारी यांच्यासह बागायती शेतीचे नुकसान झाले आहे.बीड तालुक्यातील लिंबागणेश परीसरात काल दि.०३ शुक्रवार रोजी रात्री वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने आंबे गळुन पडले असुन बहुतांश शेतकऱ्यांचे पिकायला आलेले आंबे पाऊस तसेच वादळी वाऱ्याने झडले असल्याने आंबा उत्पादक फळबागांचे नुकसान झाले आहे.

चक्रीवादळ पावसाने आंब्याच्या झडती झाली : महादेव जाधव ( आंबा उत्पादक शेतकरी)

लिंबागणेश येथील आंबा उत्पादक शेतकरी महादेव गोपाळ जाधव यांनी २८ वर्षांपासून एक हेक्टर क्षेत्रावर तोतापुरी,हुर,लालबाग, केशर आंबा आदी जातीच्या १०० आंब्याची लागवड केली आहे. महादेव यांच्या पत्नी गवळण,मुलगा गणेश यांनी पाणीटंचाई असताना देखील टँकरने पाणी घालून जगवली आहे.त्यामुळे बागेतील झाडांना चांगली फळधारणा झाली आहे. मात्र गेल्या २-३ दिवसांपासून असलेले ढगाळ वातावरणामुळे आंब्याचे नुकसान झालेच असुन त्यात दुष्काळात तेरावा महिना म्हणल्याप्रमाणे काल रात्री झालेल्या चक्री वादळ वा-याने आंब्याची गळती झाली असुन शासनाने पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी महसूल प्रशासनाला केली आहे.



महसूल प्रशासनाने आंबा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी : डॉ.गणेश ढवळे

अवकाळी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने रब्बी पिकांसह आंबा फळपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. महसूल प्रशासनाने पंचनामे करून त्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी फोनद्वारे तहसीलदार चंद्रकांत शेळके, तलाठी गणपत पोतदार आणि कृषी विभागाचे अधिकारी यांच्याशी संवाद साधुन केली आहे.

## तलवाडा येथील चि.भारत कावळे यांचे दु:खद निधन

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील मा श्री कृष्णा रामभाऊ कावळे यांचे चिरंजीव भारत कृष्णा कावळे यांचे अनेक वर्षापासून दुखत असल्यामुळे अनेक मोठमोठ्या हॉस्पिटलमध्ये भरतला उपचारासाठी नेऊन सुद्धा भरतला बरे वाटत नव्हते म्हणून परिस्थिती बिकट असताना सुद्धा कृष्णा कावळे यांनी आपल्या मुलाला उपचारासाठी कोणताही विचार न करता आपली पणाला किंमत लावली भरतला



तंदुरुस्त करण्यासाठी क्रिटिकल हॉस्पिटलमध्ये गेवराई येथे तब्बल दोन महिने ठेवण्यात आले भरत कावळे हा बरा होण्यासाठी भरतच्या वडिलांची परिस्थिती नाजूक असल्यामुळे आर्थिक मदत कमी पडत होती पण भरतला उपचार मिळावे म्हणून तलवाडा व तलवाडा परिसरामध्ये देणगी जमा करण्यात आली होती ती देणगी भरतचे वडील कृष्णा कावळे यांच्याकडे जमा करण्यात आली काही पत्रकार मंडळींनी व युवकांनी माननीय श्री फाटक साहेब यांना फोन करून सांगितले आहे की तुम्ही भरतचे प्राण वाचा आम्ही जो काही

▶▶ उर्वरित पान २ वर

## शिवप्रसाद दायमा यांना मातृशोक; प्यारनबाई दायमा यांचे वृद्धापकाळाने निधन

गेवराई। । प्रतिनिधी



गेवराई शहरातील हॉटेल व्यवसायिक महाराज अमृततुल्य या हॉटेलचे संस्थापक मालक शिवप्रसाद दायमा यांच्या मातोश्री प्यारनबाई दायमा यांचे दिनांक २ एप्रिल बुधवार रोजी दुपारी चार वाजता वृद्धापकाळाने निधन झाले आहे . मृत्यू समय त्यांचे वय ९५ वर्ष होते त्यांच्या पश्चात सत्यनारायण दायमा, सामाजिक कार्यकर्ते संतोष दायमा ,सुनील दायमा,

▶▶ उर्वरित पान २ वर

## कृष्णा अर्बन को.ऑपरेटिव्ह बँक लि.केजला ७५ लाखांचा नफा..!

### बँकेत ८६ कोटींच्या ठेवी तर ६० कोटींचे कर्ज वाटप

केज । प्रतिनिधी

केज शहरातील कृष्णा अर्बन को.ऑपरेटिव्ह बँकेत एकुण ८६ कोटींच्या ठेवी असून त्यापैकी बँकेने एकुण ६० कोटींचे कर्ज वाटप केले आहे. तर १९ कोटी रुपये बँकेने गुंतवणूक केली आहे.बँकेकडे सध्या ८ कोटींचा स्वनिधी आसून बँकेचा ग्रॉस.एन.पी.२.९६% तर निव्वळ एन पी.ए १.७३% इतका आहे. दरम्यान बँकेला यावर्षी ७५ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला असून बँकेच्या केज,बीड,माजलगाव,नांदूरघाट,कळंब,शिरुर (का) येथे एकूण ६ शाखा कार्यरत आहेत.तसेच लवकरच बँकेच्या सर्व शाखेतुन मोबाईल बँकिंग,यूपिआय,फोन पे,गुगल पे ग्राहकांच्या सेवेत सुरू होणार असून बँकेची लवकरच १०० कोटींच्या पुढे वाटचाल होणार असल्याची माहिती बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे यांनी दिली आहे. बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रम बप्पा मुंडे यांनी केज शहरात २७ वर्षांपूर्वी कृष्णा अर्बन को. ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना केली होती.बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेने ग्राहकांचा विश्वास संपादन करत यशस्वीरित्या वाटचाल केली आहे.त्यामुळे बँकेने अत्यंत अल्पावधीत ग्राहकांच्या विश्वासावर उत्तुंग भरारी घेतली असून बँकेने १०० कोटींच्या पुढे वाटचाल केली आहे.बँकेला मागील कित्येक वर्षांपासून राज्य पातळीवर विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.बँकेचे सर्व संचालक मंडळ खातेदार,ठेवीदार,सभासद, हितचिंतक व ग्राहकांच्या विश्वासाच्या जोरावर बँकेला चालु आर्थिक वर्षात ८६ कोटींच्या ठेवी प्राप्त झाल्या आसून त्यापैकी ६० कोटींचे कर्ज वाटप केले आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

## गहाळ झालेले 13 मोबाईल केले परत संभाजीनगर पोलिसांची कामगिरी

परळी । प्रतिनिधी

नागरिकांचे हरवलेले मोबाईल शोधण्याची उल्लेखनीय कामगिरी परळीतील संभाजीनगर पोलिसांनी केली आहे. नागरिकांकडून मोबाईल गहाळ झाल्याच्या तक्रारी आल्यानंतर पोलीस ठाण्याने तांत्रिक

▶▶ उर्वरित पान २ वर



**गहाळ मोबाईल परत दिलेल्या तक्रारदारांची नावे**

वसीम सलीम शेख, गणेश राजेभाऊ कोकीळ, कानिफनाथ साधू बनसोड, राधा देविदास कांबळे, तानाजी अंकुश मुळे, राजाराम लक्ष्मण गित्ते, उमाजी चंदू चव्हाण, दिनेश प्रभाकर दहिरे, राजेश पंकज गायकवाड, सचिन ईश्वर कागदे, गहिनीनाथ गुलाबराव शेप, बाबासाहेब सुर्यभान बळवंत सौदागर अंबाजी कांदे अशी गहाळ मोबाईल परत मिळालेल्या तक्रारांची नावे आहेत.

## महाराष्ट्र चतुर्थ झोन अल्पसंख्याक योजना उपाध्यक्ष पदी ललित आव्वड यांची निवड

बीड । प्रतिनिधी

श्री ऑल इंडिया श्वेताम्बर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय अध्यक्ष अतुलजी जैन, राष्ट्रीय महामंत्री अमितजी राय जैन, श्री ऑल इंडिया श्वेताम्बर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स अल्पसंख्याक योजनाचे राष्ट्रीय अध्यक्ष कांतीकुमारजी जैन यांनी दि.०२ एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्राच्या अल्पसंख्याक योजना चतुर्थ झोन उपाध्यक्ष बीड येथील



सामाजिक कार्यकर्ते ललित आब्बड यांची निवड नियुक्तीपत्र देऊन, करून जैन समाजाच्या हिताचे काम करण्याची संधी दिली आहे. बीड येथील सामाजिक कार्यकर्ते ललित आब्बड यांनी मागील अनेक वर्षांपासून बीड जिल्ह्यातील अल्पसंख्यांक समाजासह जैन समाज बांधवांच्या विविध विषयांवरील समस्या सोडवण्यासाठी काम केलेले आहे. समाजातील विविध प्रश्न ते प्रशासनापर्यंत पोहोचण्यासाठी सतत

▶▶ उर्वरित पान २ वर



बीड: वरवटी येथे धनाजीबाबा यात्रे निमित्त कुस्ती लावताना वरवटी ,आहेर धानोरा येथील सरपंच बालासाहेब आबा इंगोले ग्रामस्थ आदी मान्यवर उपस्थित होते.

## शिवरामपुरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. विडाला 25 लाखांचा नफा

### पतसंस्थेत ५१ कोटींच्या ठेवी तर ४० कोटींचे कर्ज वाटप

केज । प्रतिनिधी

विडा येथिल शिवरामपुरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेत एकुण ५१ कोटींच्या ठेवी असून त्यापैकी पतसंस्थेने एकुण ४० कोटींचे कर्ज वाटप केले आहे.तर १८ कोटी रुपये बँकेने गुंतवणूक केली आहे.बँकेकडे सध्या ३ कोटी ४१ लाखांचा स्वनिधी आहे.दरम्यान पतसंस्थेला यावर्षी २५ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला असून पतसंस्थेच्या विडा,सारूळ (बरड),येवता, नेकनूर,केज,वडवणी,चिंचोली माळी,वाघेबाभुळगाव,धारूर, युसूफवडगाव,चौसाळा,केज येथे एकूण ११ शाखा कार्यरत आहेत. तसेच पतसंस्थेची लवकरच ६० कोटींच्या पुढे वाटचाल होणार असल्याची माहिती बँकेचे चेअरमन बाबासाहेब मुळे यांनी दिली आहे. बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रम बप्पा मुंडे यांनी विडा येथे शिवरामपुरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची स्थापना केली होती.विजयकांत मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पतसंस्थेने ग्राहकांचा विश्वास संपादन करत यशस्वीरित्या वाटचाल केली आहे.त्यामुळे पतसंस्थेने अत्यंत अल्पावधीत ग्राहकांच्या विश्वासावर उत्तुंग भरारी घेतली असून पतसंस्थेने ५१ कोटींच्या पुढे वाटचाल केली आहे.पतसंस्थेला विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.पतसंस्थेचे सर्व संचालक मंडळ खातेदार, ठेवीदार, सभासद, हितचिंतक व ग्राहकांच्या विश्वासाच्या जोरावर

▶▶ उर्वरित पान २ वर

